# धक्कादायक : साडेतीन महिन्यांत ४१ जण रफूचक्कर

## पालकांच्या चिंतेत वाढ, मूल्य संस्कारांचा ऱ्हास

अमळनेर । प्रतिनिधी

गेल्या दोन वर्षात अल्पवयीन मुली, सज्ञान तरुणी, विवाहिता, तरुण यांचे पळून जाण्याचे प्रमाण भयानक वाढले असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. साडेतीन महिन्यात अमळनेर तालुक्यातून ४१ जण रफुचक्कर झाल्याची नोंद आहे. गेल्या सव्वा दोन वर्षात २९० जण मिसिंग झाले आहेत.

तरुण तरुणींमध्ये एकमेकांमबद्दलचे आकर्षण, संस्कृतीचा ऱ्हास, सोशल मीडिया, टीव्ही मालिका, चित्रपटातील अवास्तव दृश्य याचे समाजावर दुष्परिणाम होत आहेत. विशेषतः अल्पवयीन मुलांवर याचे जास्त दुष्परिणाम होत असल्याने पालकांचा धाक संपून एक अज्ञात धाडस त्यांच्यात निर्माण झाले आहे. जानेवारी पासून तर एप्रिल १४ पर्यंत अमळनेर पोलीस स्टेशन मध्ये २४ मुली १२ मुले तर मारवड पोलीस स्टेशनमध्ये मध्ये ३ मुली २ मुले असे एकूण ४१ प्रेमी रफुचक्कर झाल्याची नोंद झाली आहे.

यात अनेकांना परत आणण्यात पोलिसांना यश आले असले तरी तरुण तरुणी आपल्या आई वडिलांच्या हातात मात्र लागलेले नाही. बहुतेक जण विवाह करून परतले आहेत. कोणी आपल्या आई वडिलांना ओळखण्यास नकार दिला तर काहींनी आई वडीलासोबत जाण्यास नकार दिला. काही युगुल अद्याप पोलिसांना आढळून आले नाहीत. एक दोन जण आपापल्या पालकांकडे पाठवण्यात यश आले आहे. २०२३ मध्ये अमळनेर पोलीस स्टेशन मध्ये १०३ जणांची नोंद झाली आहे. तर २०२४ मध्ये अमळनेर ११५ व मारवड अंतर्गत ३१ असे एकूण १४६ गायब झाले होते.

अनेक घटना अशा घडतात की अल्पवयीन परिस्थितीत मुले पळून जातात. माहिती काहीच नसते. मात्र पोलिसांच्या तावडीत सापडतात आणि मग तरुणांना पोस्को कायद्यानुसार अटक करावी लागते. पालकांसाठी चिंतेची बाब बनली आहे. मिसिंगची नोंद झाली म्हणजे पोलिसांचा देखील ताण वाढतो. प्रत्येक घटनेत मुलीबद्दल सहानुभूती म्हणून पोलिसांवर दबाव वाढतो. नंतर मात्र कागदोपत्री प्रकरण फाईल करावे लागते. आणि अल्पवयीन मुलींच्या बाबतीत कायद्याने अपहरणाचा गुन्हा दाखल करावा लागतो.

अख्खं जग मोबाईलमुळे आपल्या मुलामुलींच्या हातात आले आहे, म्हणून आता पालक म्हणून आपली जबाबदारी वाढली आहे. सध्या मुले-मुली पळून जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

बदलत्या वयात होणारे शारीरिक मानसिक बदल विरूद्ध लैंगिक आकर्षण निर्माण होणे हे आकर्षण जिद्द हट्ट मध्ये रूपांतरित होते. एकमेकांविषयी जिज्ञासा वाढते, अशावेळी टोकाचे निर्णय घेतले जातात. पालकांनी वेळीच लक्षात आल्यावर योग्य व्यक्ती किंवा डॉक्टरकडून समुपदेशन करून घेतले पाहिजे. मुलगी पळते म्हणण्यापेक्षा मुलगा मुलगी दोन्ही पळतात. खरतर याबाबतीत मुलांचे व मुलाच्या पालकांचे प्रबोधन प्रशिक्षण होणे अधिक गरजेचे आहे.

**– दर्शना पवार, समाजसेविका, अमळनेर**



# ना.गिरीश महाजन यांच्या बदनामीचे तीव्र पडसाद

## धरणगावात आ.खडसेंच्या पुतळ्याचे दहन

धरणगाव । प्रतिनिधी

मंत्री गिरीश महाजन यांच्या संदर्भात राष्ट्रवादीचे नेते आ.एकनाथराव खडसे यांनी केलेल्या बदनामीकारक वक्तव्याचे धरणगावात संतप्त पडसाद उमटले. येथील भारतीय जनता पार्टी व शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी निषेधाच्या घोषणा देत आ.खडसे यांच्या पुतळ्याचे दहन केले.

शहरातील भाजपा कार्यालया पासून खडसेंच्या पुतळ्याची वाजतगाजत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका पर्यंत मिरवणुक काढण्यात आली. येथे महायुतीचा कार्यकर्त्यांनी आ. खडसे यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय महाजन व शिवसेनेचे तालुकाप्रमुख डि.ओ.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

भाजपाचे जेष्ठ नेते ना.गिरीश महाजन यांच्या विषयी अतिशय खालच्या पातळीची टिका टिपणी करून अपमानीत केल्याचे नमूद करून कोणताही आरोप करतांना त्याचे पुरावे न देता बेताल वक्तव्य करून ना.गिरीश महाजन यांची बदनामी केल्याबद्दल वक्त्यांनी आ.खडसेंचा निषेध करून जाहीर माफी मागावी अशी मागणी केली.

यानंतर आ.खडसेंच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष जिजाबराव पाटील, जेष्ठ नेते शिरीष बयस, शिवसेनेचे गट नेते पप्पुभाऊ भावे, कमलेश तिवारी, शहराध्यक्ष दिलीप महाजन, डॉ.हेडगेवार नगर ग्रामपंचायतीचे उपसरपंच व भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष चंदन पाटील, गुलाब मराठे, ललित येवले, ज्येष्ठ पत्रकार कडू महाजन, भिमराज पाटील, शिवसेनेचे शहरप्रमुख विलास महाजन, बंटी पाटील, दिनेश पाटील, जिल्हा चिटणीस प्रमिला रोकडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुरेखा पाटील, युवती प्रमुख कुंदल भाटीया, कन्हैया रायपूरकर, ललित वाणी, प्रभूदास जाधव, चेतन जाधव, चेतन पाटील, सदाशिव महाजन, धनराज सोनवणे, संजय पवार, अभय पाटील, पियुष बागड, संभाजी सोनवणे, संतोष सोनवणे यांसह महायुतीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# धरणातील गाळ काढण्यासाठी जैन समाजबांधवांचा पुढाकार

चोपडा । प्रतिनिधी

## चोपड्यात भारतीय जैन संघटनेच्या जलरथाचे तहसीलदारांच्या हस्ते उद्‌घाटन



भारतीय जैन संघटना आणि सुहाना स्पाइसेस व महाराष्ट्र राज्य सरकार मृद आणि जलसंधारण विभाग यांच्या संयुक्त करारा नुसार गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन तहसीदार भाऊसाहेब थोरात, तालुका कृषि अधिकारी दीपक साळुंखे व किरण पाटील यांनी जैन समाज बांधवांच्या शिष्टमंडळाला दिले. यावेळी भारतीय जैन संघटनेच्या जलरथाचे उदघाटन तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, नाला खोलीकरण व रुंदीकरण योजना चोपडा तालुक्यात राबविण्या संदर्भात भारतीय जैन संघटनेच्या शिष्टमंडळाने नुकतीच तहसीदार भाऊसाहेब थोरात यांची नुकतीच भेट घेतली. ज्या गावांना योजनेची माहिती नाही अशा गावात हा जलरथ घेऊन जात तिथे शेतकऱ्यांना जागृत करण्याचे काम करा असे आवाहन तहसीलदार

थोरात यांनी जैन समाज बांधवांना केले तसेच तालुका कृषि अधिकारी दीपक साळुंखे यांनी कृषि कार्यालया तर्फे आम्ही जनजागृती करीत असतो तरी देखील आपल्या मार्फत शेतकऱ्यांना जागृत केले तर भरपूर गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार नाला खोलीकरण व रुंदीकरण याबाबत चोपडा तालुक्यात जास्तीत जास्त कामे व्हावी अशी प्रशासनाची इच्छा आहे त्यासाठी प्रशासन सहकार्य करायला तयार आहे, अशी ग्वाही कृषि अधिकारी साळुंखे यांनी यावेळी बोलतांना दिली. भारतीय जैन संघटनेच्या शिष्टमंडळात दीपक राखेचा, विभागीय उपाध्यक्ष लतिश जैन, विपुल छाजेड, अभय ब्रम्हेचा, शुभम राखेचा तसेच प्रचारक महेन्द्र पाटील व जिल्हा समन्वयक गणेश कोळी यांचेसह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन महत्त्वपूर्ण योजनांना कायमस्वरूपी मंजुरी देण्यात आली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन करता येणार असून, शेतजमिनी ची सुपीकता वाढविण्यास मदत होणार आहे. या योजनेमुळे यंत्रसामग्री व इंधनाचा खर्च प्रशासन करणार असून, तलावातून काढलेला सुपीक गाळ शेतात टाकण्यासाठी शासनाकडून अल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अनुदान दिले जाणार आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेचा गावा गावात जाऊन प्रचार, प्रसार करणे, योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त गावांना प्रोत्साहित करणे, जिल्हा प्रशासनाकडे अर्ज करण्यास सहकार्य करणे तसेच सर्व लोकप्रतिनिधीं सह तालुका व जिल्हा प्रशासनाची भेट घेऊन चर्चा करून योजनेची व्यापकता वाढवण्याचे काम भारतीय जैन संघटना करीत आहे.

# चाळीसगाव येथे घरातून २५ हजार रुपयांची चोरी

चाळीसगाव । प्रतिनिधी

शहरातील करगावरोड येथील एकाच्या घरातून रंगकाम करणाऱ्या पेंटरने २५ हजार रुपये चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, रंगकाम करणारा पेंटर सोनू राजू पंजे (रा.पवारवाडी,चाळीसगाव) याने ११ रोजी सायंकाळी ६ ते ७ वाजेच्या दरम्यान शहरातील करगावरोडवरील आनंद अनिल बुंदेलखंडी यांच्या रॉयल बंगल्यातील बेडरूममध्ये अनधिकृतपणे प्रवेश करून लाकडी कपाटाचे ड्राव्हर उघडून त्यातून २५ हजार चोरून नेवून घरफोडी केली. या बाबत आनंद बुंदेलखंडी यांनी १५ रोजी चाळीसगाव शहर पोलिसांत त्याच्या विरुद्ध फिर्याद दिली. त्यावरून पंजे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५,३३१(३) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# सातपुड्यात कुजलेल्या अवस्थेत आढळला महिलेचा मृतदेह

यावल । प्रतिनिधी

तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगेत ३० ते ४० वर्षे वयाची महिलेचे अत्यंत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने यावल पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

यावल तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगेत वनमजूर लतिराम रमेश बारेला राहणार घाड्या हे १४ एप्रिल २५ रोजी सकाळी बारा वाजेच्या पूर्वी तालुका यावल शिवारात निळकंठ कुटियाचे डावीकडे अंदाजे अडीचशे मीटर अंतरावर रस्त्याची दक्षिण बाजूस असलेल्या कोरड्या तलावाजवळ फिरून गस्त घालीत असताना त्यात कुजलेल्या अवस्थेत मृतदेह त्यांना अनोळखी महिला वय सुमारे ३० ते ४० वर्षे नाव गाव पत्ता माहीत नाही असे आढळून आला. याबाबत त्यांनी यावल पोलीस स्टेशनमध्ये येऊन खबर दिल्यामुळे अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर २२ २०२५ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे याबाबत अकस्मात वृत्तीची नोंद करण्यात आली असून या अकस्मात मृत्यूचा तपास स्वतः पीआय प्रदीप ठाकूर करीत आहेत. जामन्या या गाड्या येथे यावल पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर आणि त्यांचा स्टाफ तसेच फॉरेन सीक लॅबचे अधिकारी व कर्मचारीयांनी भेट दिली. अप्पर पोलीस अधीक्षक नखाते, डी वाय एस पी कृष्णांत पिंगळे व एलसीबी पीआय बबनराव आव्हाड यांनी घटनास्थळी भेट दिली. तिच्यासोबत काही तिच्या घरगुती भांडीकुंडी सोबत आहेत. ती तब्बल आठ ते दहा दिवसांपूर्वी मरण पावलेली असल्याचा प्राथमिक अंदाज वैद्यकीय अधिकारी डॉक्टर जावळे यांनी व्यक्त केला आहे. यावल पोलीस स्टेशन तर्फे जळगाव सिव्हिल हॉस्पिटल येथे शव विच्छेदनासाठी यावल पोलिसांकडून शव विच्छेदन करून मरणाचे नेमके कारण काय? यासाठी पाठवण्यात आले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पाचपोडे हे सदरचे प्रेत घेऊन गेले आहेत सातपुड्यात घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण पोलीस प्रशासन या घटनेकडे तपासाच्या दृष्टिकोनातून धावपळ करताना दिसत आहे.

# मारवड येथील आगीत २९ लाखांचे नुकसान

## कळमसरे येथेही ज्वारी, चारा जळून खाक

अमळनेर । प्रतिनिधी–

तालुक्यात आगीचे सत्र सुरूच असून मारवड, ढेकू नंतर कळमसरे शिवारात शेतात लागलेली आग आजुबाजूला पसरल्याने ज्वारी व चारा खाक झाला आहे. तर मारवड येथील आगीत १२ जणांचे २९ लाख ५६ हजार ८७६ रुपयांचे नुकसान झाले आहे.

याबाबत मारवड पोलिसात ज्ञानेश्वर एकनाथ बडगुजर यांनी फिर्याद दिली की, त्यांचे कळमसरे शिवारात पाच बिघे शेत असून त्यात ज्वारीचे पीक लावले होते व ते काढणीसाठी कापून शेतात ढीग करून ठेवले होते. व त्यातून शंभर क्विंटल ज्वारी येणे अपेक्षित होते. मात्र ११ एप्रिल रोजी बाजूच्या शेतात अज्ञात व्यक्तीने लावलेली आग ज्ञानेश्वर बडगुजर यांच्या शेतात पोहचल्याने ज्वारीची गंजी खाक झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जवळपास शंभर क्विंटल ज्वारी, चारा व शेती साहित्य जळून खाक झाले आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करण्यात येऊन सदर अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ संजय पाटील हे करीत आहेत.

दरम्यान मारवड येथील आगीचा पंचनामा करण्यात आला असून पुंजू शिवलाल चौधरी यांचे ७ लाख ९१ हजार, प्रवीण आधार पाटील यांचे ३ लाख ७७ हजार, किरण वसंतराव साळुंखे (२ लाख २५ हजार ), कैलास रामचंद्र पाटील (२ लाख ७६ हजार), विलास प्रकाश पाटील (२ लाख ५० हजार), महेश हेमकांत पाटील (१ लाख ५० हजार रुपये), सचिन गुलाबराव पाटील (१ लाख ३१ हजार), अशोक अमृत पाटील (१ लाख ३५ हजार), दिलीप नीलकंठ पाटील (१ लाख ३५ हजार), रवींद्र अमृत पाटील (८५ हजार), मांगो पितांबर पाटील (२ लाख ३१ हजार ८७६ रुपये), गजानन मन्साराम चौधरी (१ लाख ७० हजार रुपये) असे एकूण २९ लाख ५६ हजार ८७६ रुपयांचे नुकसान झाले. ग्राम महसूल अधिकारी महेंद्र भावसार यांनी पंचनामा केला.




# पुनगाव येथे विकासकामांचे भूमिपूजन

पाचोरा । प्रतिनिधी

तालुक्यातील पुनगांव ग्रामपंचायतीच्या वतीने विविध योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण व नवीन कामांचे भुमीपुजन १४ एप्रिल डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत मोठ्या उत्साहात करण्यात आले.

पुनगाव गृप ग्रामपंचायतीसाठी नुकतीच पालकमंत्री ग्रामपंचायत विकास योजना विशेष जनसुविधा अनुदान अंतर्गत नुतन ग्रामपंचायत इमारत बांधकाम आमदार किशोर पाटील यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आले आहे. तसेच आमदार निधीतून पुनगाव येथे क्रांतीसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या स्मारकाचे काम मंजूर करण्यात आले आहे या ३५ लक्ष रुपयांच्या दोन्ही कामांचे भुमीपुजन व पुनगांव येथील शिवस्मारक, व्यायाम शाळा, तलाठी कार्यालय या तिन्ही कामांचे लोकार्पण आमदार किशोर अप्पा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पुनगावचे माजी सरपंच प्रविण पाटील व रविंद्र गुजर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी सरपंच सौ.सुनिता चिंतामण पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बोरसे, विस्तार अधिकारी नारायण परदेशी, उपसरपंच मनोज मोरे, अनिल पाटील, प्रल्हाद गुजर, अनिल परदेशी, आबा सोनवणे, शिवलाल मोची, नारायण मोची, पोलीस पाटील प्रविण ठाकुर, ग्रामसेवक विकास पाटील, विकास सोसायटीचे चेअरमन प्रल्हाद पाटील नवीन गुजर, पत्रकार प्रविण ब्राह्मणे यांच्या सह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



चोपडा तालुका आयएमए इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ.मंगेश वैद्य यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना डॉ.दीपक चौधरी, डॉ.पवन पाटील, भाजपाचे तालुका सरचिटणीस कांतीलाल पाटील, दोडे गुजर संस्थांनचे संचालक डी.बी.पाटील.

# तरुणीसह चार लाखांचा ऐवज घेऊन एकाचा पोबारा

## चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हा

चाळीसगाव । प्रतिनिधी

शहरातील एका भागातील २२ वर्षीय तरुणीस घरातून फूस लावून पळवून घेवून जात मुलीचे घरातून रोख रूपये व सोन्याचांदीचे दागिणे असा सुमारे ४ लाख ६ हजार रूपयांचा ऐवज घेवून एकाने पोबारा केला आहे. याप्रकरणीच चाळीसगाव पोलीस स्टेशना पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शहरातील एका भागातील कुटुंब दि.१४ रोजी पहाटे ६ वाजेच्या सुमारास झोपेतून उठले असता २२ वर्षीय तरुणी घरात दिसून आली नाही. घरातील सदस्यांनी आसपास मुलीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यामुळे कुटुंबियाने चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन गाठत काही एक न सांगता मुलगी घरातून निघुन गेली, मुलीच्या कुटुंबियाने गल्लीतील मंदिरावर व आसपासच्या घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पाहीले असता, या तरुणीस संशयित बिलाल शहा लुकमान शहा राश दत्त गल्ली, घाट रोड हा तिस सोबत घेऊन जातांना दिसला, तर या मुलीस पळवून घेऊन जाण्यासाठी अमीर उर्फ बबडी निसार शेख, छन्नो उर्फ सलीम शेख सनम शेख है दुचाकीवर येवून त्यांना मदत करतांना दिसून आले. तर नुरा उर्फ नुरोद्दीन शेख याचे मालकीची लाल रंगाची स्विफ्ट गाडी जातांना दिसली. मुलीच्या कुटुंबियाने आसपासच्या नागरीकांकडे विचारणा केली असता, तरुणीस बिलाल शहा हा पळवून घेऊन गेला व त्यांना घेऊन जाण्यासाठी बबड़ी शेख, सलीम शेख नुरोद्दीन शेख व नदीम खान उर्फ नदीम गोल्डन साबीर खान सर्व रा.चाळीसगाव यांनी मदत केली, तसेच घरात जावून पाहीले असता घरात ठेवलेले अडीच लाख रूपयांची रोकड व १ लाख ५६ हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागिणे असा सुमारे ४ लाख ६ हजार रूपयांचा ऐवज दिसून आला नाही, सदरचे पैसे व सोन्याचे दागिणे सदर तरुणीस आरोपीतांनी संगनमत करून कट रचून तिला फूस लावून घरातून काढून आणण्यासाठी प्रवृत्त केले व तिचे अपहरण केले.

या प्रकरणी मुलीच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून बिलाल शहा लुकमान शहा याच्यासह अमीर उर्फ बबडी निसार शेख, छन्नो उर्फ सलीम शेख सनम शेख, नुरा उर्फ नुरोद्दीन शेख शफरोद्दीन शेख व नदीम खान उर्फ नदीम गोल्डन साबीर खान सर्व रा. चाळीसगाव यांच्या विरुद्ध चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला भारतीय न्याय संहिता कलम १४०(३), ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# तेली महासंघाची पारोळा तालुका कार्यकारिणी गठित



पारोळा । प्रतिनिधी–

महाराष्ट्र प्रदेश तेली महासंघ जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्ष दत्तात्रेय तुकाराम चौधरी व जिल्हा सचिव अनिल रामदास पाटील यांनी पारोळा येथे सह विचार सभा घेवुन पारोळा तालुका महाराष्ट्र प्रदेश तेली महासंघाची कार्यकारणी जाहीर केली.

सह विचार सभेत समाजातील कौटुंबिक भांडण, तंटे सोडविण्यासाठी जळगांव जिल्हा तेली समाज तंटामुक्ती समितीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची यशोगाथा सर्वांसमोर मांडली आतापर्यंत जळगाव जिल्ह्यात मागील एक वर्षात ३५ कुटुंबातील गृह कलह व किरकोळ वाद मिटवुन संसार उभे करण्यात कार्यकारिणीला यश आले. सध्या जिल्ह्यात ११ तालुक्यात कार्यकारिणी गठीत करण्यात आली असुन पारोळा तालुका गठीत करण्यात आली. तालुकाध्यक्षपदी अनिल दयाराम चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली तर, प्रवीण शंकर चौधरी म्हसवे, भिका देवचंद चौधरी तरवाडे, सोमनाथ रामचंद्र चौधरी बहादरपूर यांची तालुका उपाध्यक्षपदी, योगेश प्रकाश चौधरी बोळे सचिवपदी, विनोद पुनाजी चौधरी विचखेडे सहसचिवपदी, प्रकाश नारायण चौधरी पारोळा कार्याध्यक्षपदी, सुनील शिवाजी चौधरी खजिनदारपदी, भागवत राजाराम चौधरी संघटक प्रमुख, राजेंद्र शिवराम चौधरी तामसवाडी संघटक प्रमुख, योगेश गोपाल चौधरी बहादरपूर संघटक प्रमुख या पदी नियुक्ती करण्यात आली. सदरील निवड प्रसंगी जिल्हाध्यक्ष दत्तात्रय तुकाराम चौधरी, जिल्हा सचिव अनिल रामदास पाटील, पारोळा तेली समाज अध्यक्ष कैलास आनंदा चौधरी, उपाध्यक्ष सतिष मधुकर चौधरी, सचिव मनोज चौधरी, सहसचिव कपिल चौधरी, नगरसेवक भैय्या चौधरी, साहेबराव चौधरी, गोकुळ चौधरी सुरेश चौधरी, दिलीप चौधरी, गोकुळ चौधरी, यांची उपस्थिती होती तर या निवडी बद्दल प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी, माजी आमदार शिरीष चौधरी, पारोळ्याचे आमदार अमोल पाटील व शिवसेना शहरप्रमुख अमृत चौधरी यांनी अभिनंदन केले. सुत्रसंचालन अनिल पाटील तर आभार अनिल चौधरी यांनी मानले.

